REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २६ मार्च १९४७ अंक १३



## सारस्वत
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३१-१-१९४७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,०४,००० |
| ठेवी | ... | रु. ६८,५९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७५,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम

व्याज : २ टक्के

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा -

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रुपये |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदूची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— चरक

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैलीं ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

## विविध माहिती

**चीनची राजधानी, नानकिंग**—चीनची राजधानी पुनः नानकिंगला परत आली आहे. विधिमंडळाचे १,७०० सभासद तेथें आले असले तरी त्यामुळें शहरांतील दाटीवर विशेष प्रतिकूल परिणाम झालेला नाहीं. इतक्या दाटीच्या ठिकाणीं हजार-दोन हजारांच्या येण्या-जाण्यानें काय फरक पडणार ? विधिमंडळाच्या सभागृहांत प्रत्येक सभासदाचे टेबलास एक विजेचें बटन असतें, तें दाबलें म्हणजे अध्यक्षांचे शेजारच्या भिंतीवरील विजेच्या शेंकडो दिव्यांपैकीं एक दिवा लागतो. विजेचें बटन दाबून मत देण्याची तेथें पद्धत आहे. जितके दिवे लागले असतील तेवढे एकूण उपस्थित सभासदांच्या संख्येंतून वजा केले, म्हणजे ठराव मंजूर का नामंजूर हें तात्काळ सांगतां येतें.

**रशिआला पार्सलें पाठविण्याची सोय**—निर्यातीसंबंधींचीं बंधनें आणि परराष्ट्रीय चलनाचीं बंधनें संभाळून रशिआला पार्सलें पाठवितां येण्याची सोय हिंदी पोस्ट ऑफिसांतून करण्यांत आली आहे. हीं पार्सलें ब्रिटनमार्गेच जावयाचीं आहेत.

**हंगेरीला अमेरिकन कर्ज**—अमेरिकेनें हंगेरिअन सरकारला १ कोटी, ५० लाख डॉलर्सचें नवीन कर्ज मंजूर केलें आहे. अमेरिकन परराष्ट्रीय खात्यानें आणखी कर्ज देण्याची तयारी दर्शविली आहे.

**जागतिक व्यापार परिषद**—जिनीव्हाला, ८ एप्रिलपासून आंतरराष्ट्रीय व्यापार परिषदेच्या प्राथमिक समितीची दुसरी बैठक भरणार आहे. हिंदुस्थान सरकारतर्फे व्यापारमंत्री मि. चुंद्रीगर उपस्थित रहाणार असून त्यांना मदतनीस म्हणून सरकारच्या व्यापार खात्याचे दोन प्रमुख अधिकारीहि जिनीव्हाला जाणार आहेत.

**कापड-गिरण्यांची यंत्रसामुग्री**—कापडाच्या गिरण्यांचीं यंत्रें परदेशांतून आयात करण्यासाठी जे परवाने मध्यवर्ती सरकारनें दिले आहेत, ते रद्द करण्याचा सरकारचा विचार नाहीं असे मध्यवर्ती सरकारनें मद्रास सरकारला पुन्हा कळविलें आहे. परवाने रद्द केल्यास अविश्वासाचें वातावरण उत्पन्न होऊन शिवाय परवाने धारण करणाऱ्यांचें फार नुकसान होईल असें कारण पत्रकांत सांगण्यांत आलें आहे. कापडाच्या गिरण्यांना प्रतिबंध करणारा हुकूम मद्रास प्रांतांत नाहीं.

**उद्योगधंद्यावर सरकारचें नियंत्रण**—मद्रास सरकारनें एक पत्रक काढून देशाच्या संरक्षणार्थ संबंधित असलेले उद्योगधंदे सरकारी मालकीचे व नियंत्रित राहतील असें जाहीर केलें आहे. त्याशिवाय, नियुक्त अर्थ योजनेच्या सोईसाठीं 'मूलभूत धंदे' आणि 'सार्वजनिक उपयोगाचे धंदे' असेहि दोन वर्ग करण्यांत आले असून त्यावर कमी अधिक प्रमाणांत सरकारी नियंत्रण रहाणार आहे.

**आशिआंतील राष्ट्रांची परिषद**—ता. २३ मार्चला सुरू झालेल्या, आशियांतील राष्ट्रांच्या परिषदेचें कामकाज तबकड्यांवर ध्वनिमुद्रित करण्यांत येत आहे.

**युक्रेनिअन सरकारचें अभिनंदन**—संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या बैठकींत, दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या प्रश्नास पाठिंबा दिल्याबद्दल पं. नेहरूंनीं युक्रेनिअन सरकारला कृतज्ञता व्यक्त करणारें पत्र धाडलें आहे.

**पोलादाची व लोखंडाची आयात**—देशांतील पोलादाची व लोखंडाची टंचाई लक्षांत घेऊन, परदेशांतून त्यांची आयात करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें अधिक सवलती देण्याचें ठरविलें आहे.

**नव्या भांडवल उभारणीस परवानगी**—१० मार्च अखेर पुऱ्या झालेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारनें १८ कंपन्यांना ९ कोटि, ४२½ लक्ष रुपयांच्या भांडवल उभारणीस परवानगी दिली. त्यांत पाकिस्तान हेरल्ड लि. ( वृत्तपत्र ), साहेबगंज पेपर मिल्स लि. ( कागद ), अतुल प्रॉडक्ट्स लि. ( रंग-रसायनें ), नॅशनल न्यूज प्रिंट अँड पेपर मिल्स लि. ( कागद ) ह्या नव्या कंपन्या आहेत. सिंटेटिक ( इंडिया ) लि. ९ लाखांचे नवे शेअर्स काढीत आहे. मेसर्स लॉंगमन्स, ग्रीन आणि कं. लि. ही ब्रिटिश कंपनी विकत घेण्यासाठी इंड-लॉंगमन्स लि. कलकत्ता ही १८ लाखांची कंपनी स्थापन होत आहे. रॅली ब्रदर्स लि. या ब्रिटिश कंपनीची हिंदुस्थानांतील कांहीं मालमत्ता विकत घेऊन धंदा चालविण्यासाठी रॅली ब्रदर्स इंडिया लि. ही २½ कोटींची कंपनी स्थापन होत आहे.

**ब्रिटिश मजूर पक्षांत पुन्हा वावटळ**—अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रूमन यांनीं अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल काढलेल्या उद्गारामुळें ब्रिटिश मजूर पक्षांतील कांहीं सभासद ह्यासंबंधीं पार्लमेंटांत चर्चा करण्याची मागणी करणार आहेत.

**आंतरराष्ट्रीय मदत संघटना**—युद्धाच्या आपत्तीमुळें संकट उत्पन्न झालेल्या देशांना मदत करण्यासाठी अनराची स्थापना झाली. या संघटनेंतील एकंदर नोकरवर्ग साडेसतरा हजार असून त्यांपैकी तेहतीस हिंदी नागरिक आहेत. या ३३ पैकी तीन मुसलमान असून बाकीचे मुसलमानेतर आहेत. अशी माहिती हिंदुस्थान सरकारचे व्यापार मंत्री मि. चुंद्रीगर यांनीं मध्यवर्ती विधिमंडळांत सांगितली.

**कापड नियंत्रण समिती**—टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डावर ग्राहकांच्या तर्फे १५ प्रतिनिधी व हातमाग कामगारांतर्फे २ प्रतिनिधी घेण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. आतांपर्यंत बोर्डावर ग्राहकांचे २ आणि विणकर-कामगारांचा १, असे प्रतिनिधी होते.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

**हेड ऑफिसः—पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. वी. साल्वेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

# अर्थ

बुधवार, ता. २६ मार्च, १९४७





प्रा. वा. मो. काळे


संपादक :

श्रीपाद् वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## बँकिंगच्या धंद्याची परिस्थिति

मुंबईमधील असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन लि. नांवाची एक शेड्यूल्ड बँक बंद पडल्याकारणानें तेथील बँकिंगच्या क्षेत्रांत थोडेसें संशयाचें वातावरण निर्माण झाल्यासारखें दिसत आहे. सर्वच बँका आपले पैसे तरते ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि नवीं कर्जें फारच सावधगिरीनें व अत्यंत अल्प प्रमाणावर देत आहेत. ठेवीदारांनीं ठेवी परत मागतांक्षणींच त्या तात्काळ देतां याव्या, ह्या दृष्टीनें बँका आपलें धोरण आखीत आहेत. हें करीत असतांनाच, किफायतशीर व बिनधोक कर्जें देत रहाणें धंद्याच्या दृष्टीनें आवश्यकच आहे. तथापि, कांहीं काळ तरी बँकांचे चालक फायद्याच्या दृष्टीपेक्षा सुरक्षितपणास व तरतेपणासच प्राधान्य देतील व तें तसें त्यांनीं द्यावें, हें रास्तच आहे.

महाराष्ट्रांतील बँकांपुरता विचार केला तर त्यांची परिस्थिति बिकट होण्याचें कारण नाहीं, हें त्यांच्या ठेवींच्या प्रकारावरून लक्षांत येईल. त्यांच्या ठेवींत मध्यमवर्गीयांच्या बचतीच्या ठेवींचाच मुख्य भरणा असतो आणि चालू खात्यांतील ठेवींचे मानानें मुदती व सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवी भरपूर असतात. त्याचा अर्थ, बँकांकडे तात्काळ मागणी येऊं शकेल, अशा प्रकारच्या भरमसाठ ठेवी त्यांचेकडे फारशा नसतातच. त्यांत पुन: महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या बँकांकडे असलेल्या प्रत्येक ठेवीची सरासरी रक्कम फार मोठी नसते. ठेवींची एकूण रक्कम अनेक ठेवीदारांत विभागलेली असते. ही बाब बँकेच्या कचेरीच्या व्यवस्थेच्या दृष्टीनें मामुली काळांत खर्चाची व गैरसोईची असली तरी सध्यासारख्या परिस्थितींत ती निश्चित हिताची आहे. युद्धकाळांत बँकांनीं आपलें शेअर भांडवल व रिझर्व्ह फंड ह्यांत बरीच भर घालून स्वत:चें, बिन-परतीचें मोठें भांडवल निर्माण केलेलें आहे हाहि मुद्दा त्यांच्या मजबुतीस कारणीभूत होणारा आहे. बँकांनीं आपल्या एकूण खेळत्या भांडवलापैकी पुष्कळशी रक्कम सरकारी रोख्यांत गुंतविलेली असते आणि ह्या रोख्यांचे तारणावर त्यांस केव्हांहि सुलभतेनें पैसे उभे करतां येतात. तशी त्यांनीं आगाऊ व्यवस्था करून ठेवलेली असते. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे आपल्या बँकांच्या परिस्थितीची नीट कल्पना येईल, आणि निष्कारण गैरसमजास वाव रहाणार नाहीं.

शेड्यूल्ड बँकांकडील, मागणी करतांच काढून घेतां येण्याजोग्या ठेवींच्या मालकीसंबंधीं एक चौकशी रिझर्व्ह बँकेनें नुकतीच केली, तिचा निष्कर्ष आतां प्रसिद्ध झाला आहे. एकूण ठेवींपैकीं दोन तृतीयांश ठेवी ह्या प्रकारच्या असतात. १९४५ अखेरच्या ह्या ५९० कोटींच्या ‘ डिमांड ’ ठेवींपैकी २५९ कोटींच्या ठेवी ( ४३·९०% ) व्यापारी वर्गाच्या होत्या व २९·७७% व्यक्तिगत ठेवी होत्या. अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्या देशांतील बँकांकडील ठेवींत व्यापारी वर्गाच्या ठेवींचें प्रमाण ह्यापेक्षा पुष्कळच अधिक असतें, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| | व्यापारी ठेवी ( एकूण ठेवींशीं प्रमाण ) | व्यक्तिगत ठेवी ( एकूण ठेवींशीं प्रमाण) |
|---|---|---|
| अमेरिका | ५७·९% | ३५·६% |
| ग्रेट ब्रिटन | ६६·८% | ३३·२% |
| हिंदुस्थान | ४३·९% | ४२·२% |

हिंदुस्थानांतील बँकांकडील चालू खात्यावरील रकमांत व्यापारी ठेवींपेक्षा व्यक्तिगत ठेवींचा भरणा ज्यास्त असतो; महाराष्ट्रीय बँकांकडील ठेवींत, अगोदरच चालू ठेवींचें एकूण ठेवींशीं प्रमाण इतर बँकांशीं तुलना करतां, अल्प असतें आणि चालू ठेवींतहि लहान रकमांच्या ठेवींची संख्याच पुष्कळ असते, ह्या सर्व गोष्टी विशेष किफायतशीर नसल्या तरी सुरक्षितपणास पोषक आहेत, हें उघड आहे. व्यापारविषयक अडचणींची झळ व्यक्तिगत ठेवींपेक्षा व्यापारी ठेवींस आधीं लागण्याचा संभव असतो, ही गोष्टहि येथें लक्ष्यांत घेतली पाहिजे. युद्धकाळांत बँकिंगची झालेली वाढ आंगलट येऊं नये व पंचवीस वर्षांपूर्वीच्या गंडांतराची पुनरावृत्ति होऊं नये, ह्या दृष्टीनें सरकारनें उपाययोजना पूर्वीपासूनच चालू केलेली आहे आणि पंचवीस वर्षांपूर्वींच्या मानानें आजच्या सर्वच बँका कितीतरी पटीनें भक्कम पायावर आधारलेल्या आहेत, असें सामान्यपणें म्हणता येईल. बँकिंगचा धंदा हा पतीवर आधारलेला धंदा असल्याकारणानें, अंतिम भक्कमपणा असला तरी संशयामुळें निर्माण होणाऱ्या भरमसाट घबराटीस तो धंदा फार काळ तोंड देऊं शकत नाहीं हें ध्यानीं बाळगून, बेजबाबदार वृत्तीस येथें स्थान मिळतां कामा नये.

## औद्योगिक बांधे

१९४५ सालीं सबंध हिंदुस्थानांत ( पंजाब वगळून ) ८२० औद्योगिक बांधे झाले, त्यांत ७,४७,५३० कामगारांचे कामाचे ४०,५४,४९९ दिवस बुडाले. १९४४ सालीं ६५८ बांध्यांत ५,५०,१५ कामगारांचे ३४,४७,३०६ दिवस बुडाले होते. म्हणजे औद्योगिक बांध्यांत २५% व बुडालेल्या कामाचे दिवसांत १७·६% वाढ झाली. मुंबईमध्यें सर्वांत ज्यास्त म्हणजे ३१० बांधे झाले. त्याचे खालोखाल बंगालचा ( २१७ बांधे ) अनुक्रम येतो. मुख्यत: गिरण्या व इंजिनिअरिंग वर्कशॉप्स ह्यांतच बांधे झाले. ५७·३% बांध्यांचें कारण वेतनवाढ व बोनस हें होतें. १३४ बांध्यांत कामगारांना पूर्णपणें यश आलें, तर ३७० बांध्यांत ते पूर्णपणें अयशस्वी ठरले. १५५ बांध्यांत त्यांस कांहीं अंशीं यश मिळूं शकलें.

**पोलाद व कागद ह्यांचें संरक्षण संपलें:**—टारिफ बोर्डानें पोलाद व कागद या हिंदी धंद्यांस आतां संरक्षणाची आवश्यकता नाहीं, असें आपलें मत व्यक्त केलें आहे. सध्याच्या संरक्षक जकातींची जागा साध्या आयात–जकातींनीं घेतली जाईल. पूर्ण चौकशीची पुन: मागणी करण्याचा अधिकार ह्या धंद्यांस आहेच. संरक्षण जकातीचें प्रमाण धंद्याच्या वाढीच्या दृष्टीनें निश्चित केलेलें असतें; आयात जकाती बसवितांना त्यांचेपासून मिळणारें उत्पन्न हीच बाब महत्त्वाची असते.

# स्फुट विचार

## आयुर्विमा आणि नवी राज्यघटना

हिंदी आयुर्विमा संघटनेचें १९ वें वार्षिक अधिवेशन श्री. के. सी. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मद्रास येथें नुकतेंच भरलें होतें. या प्रसंगीं श्री. देसाई यांनीं आपल्या भाषणांत विमा कंपन्यांच्या अडचणाचा सालाबादप्रमाणें उल्लेख केलाच आहे. परंतु त्याशिवाय अधिक महत्त्वाच्या प्रश्नांवरही त्यांना बोलण्याचा प्रसंग पडला. हिंदुस्थानची नवीन राज्यघटना बनवितांना घटनासमितीला सर्व हिंदुस्थानकरतां घटना तयार करतां आली तर बरेंच होईल. पण तसें न झालें, तर प्रांतागणिक नाहीं तरी त्रिमंत्री-योजनेप्रमाणें हिंदुस्थानचे तीन गट पडणार; आणि मग सध्या मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंत असलेला विमा हा विषय तीन प्रांतगटागणित वेगळा होण्याचा संभव निर्माण झाल्यासेरीज रहाणार नाहीं. असा प्रसंग उद्भवल्यास हिंदुस्थानांतील विमा व्यवसायाला जबर धका बसेल यांत शंका नाहीं. श्री. देसाई यांनीं या प्रश्नाबाबत दिलेले आकडे उद्बोधक आहेत. हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत विमा-व्यवसायाची वाढ कमी अधिक प्रमाणांत झाली आहे. विमा कंपन्यांची संख्या पाहिली तर 'अ' गटांत १२५, 'ब' गटांत फक्त १८ आणि 'क' गटांत ४९ कंपन्या अशी परिस्थिति आहे. "अ" गटांत मद्रास, मुंबई, सं. प्रांत, बिहार, मध्यप्रांत व ओरिसा हे येतात. "ब" गटांत पंजाब, सरहद्द प्रांत व सिंध ह्यांचा समावेश होतो. बंगाल व आसाम ह्यांचा "क" गट होतो. कंपन्यांच्या मालमत्तेच्या दृष्टीनेंहि स्थूलमानानें असाच प्रकार आहे. तेव्हां विम्याच्या दृष्टीनें मागासलेल्या प्रांतांची भरभराट करण्याच्या दृष्टीनें सुद्धां विमा प्रांतिक अगर गटांचा विषय होणें इष्ट ठरणार नाहीं. याशिवाय अखिल भारतीय दृष्टीनेंहि अनेक व्यावहारिक अडचणी उत्पन्न होतील आणि त्याचा परिणाम विमा-व्यवसायाची प्रगति खुंटण्यांत होईल. श्री. देसाई यांनीं कंपन्यांचा पैसे गुंतविण्याबद्दल सवलतीची मागणी, प्राप्तीवरील कराची आकारणी ४५ पै करण्याची मागणी, इत्यादि मागण्या केल्या असून सध्याचें मध्यवर्ती सरकार त्या मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करील अशी अपेक्षा आहे.

---

## १९४७ ची अन्नधान्य परिस्थिती

हिंदुस्थानांतील अन्नधान्याची टंचाई १९४७ सालांत तरी दूर होत नाहीं असा अंदाज आहे. याला मुख्यतः तीन कारणें आहेत. (१) खुद्द देशांत पीकपाणी व्हावें तसें झालें नाहीं, (२) प्रांताप्रांतांतून सक्तीची सरकारी धान्यवसुली नीट होत नाहीं आणि (३) बाहेरच्या देशांतून आयात जरूर तितकी करतां येत नाहीं. सध्या चालू असलेलें शिधा नियंत्रण जुलै ते ऑक्टोबर या बिकट काळांत चालू ठेवणें कठीण जाणार आहे. तांदूळ आणि गहू यांची टंचाई या काळांत जाणवणार अशीं चिन्हें दिसत आहेत. पंजाब आणि संयुक्त प्रांत अंदाजे अनुक्रमें ४० लाख व ३० लाख टन गहू दरवर्षी पिकवितात. परंतु पाऊस उशीरा व अनियमित पडल्यामुळें त्या प्रांतांतील गव्हाचें पीक यावें तसें आलेलें नाहीं. मध्य हिंदुस्थानांत म्हणजे भोपाळ, ग्वाल्हेर, इंदूर, मध्यप्रांत या भागांतहि पिकांना कीड लागल्यामुळें उभीं शेतें पेटवून द्यावीं लागलीं. या कारणाबरोबरच काळ्या बाजाराची प्रवृत्ति शेतकरी लोकांत वाढत आहे. मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्रि, बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं बिहार प्रांतांत काढलेल्या दौऱ्यांत त्यांना ही गोष्ट उघडपणें लक्षांत आली. सरकारी सक्तीच्या धान्यवसुलीबाबत उत्पादकांनीं सहकार्य करावें अशी विनंति त्यांनीं केली. परंतु त्याचबरोबर सरकारी योजनेशीं असहकार केल्यास कडक उपायांचा अवलंब करावा लागेल असेंही त्यांना बजावावें लागलें. एकंदरीनें, अन्नधान्याचा प्रश्न १९४७ सालीहि बिकटच रहाणार असें दिसतें.

---

## ध्वनिक्षेपणाचा अष्ट-वार्षिक कार्यक्रम

मध्यवर्ती सरकारचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनीं पत्र पंडितांच्या बैठकींत, हिंदुस्थानांतील ध्वनिक्षेपक-केंद्रांसंबंधीं आठ वर्षांच्या योजनेची रूपरेषा नुकतीच जाहीर केली. या कार्यक्रमांत मुंबई, दिल्ली, मद्रास व कलकत्ता या चार ठिकाणीं चार मोठीं केंद्रें स्थापण्यांत येणार आहेत. त्याशिवाय मद्रास व कलकत्ता येथें ध्वनिक्षेपणाच्या केंद्रांसाठी सुसज्ज इमारती बांधल्या जाणार असून कराची, नागपूर, बेझवाडा, अहमदाबाद, कटक, धारवाड, गौहत्ती व अलाहाबाद या ठिकाणींही दुय्यम दर्जाचीं केंद्रें उभारण्यांत येणार आहेत. या योजनेला कायम स्वरूपाचा असा खर्च साडेतीन कोटी रुपये येणार आहे आणि दरवर्षी करावा लागणारा खर्च ८६ लाख इतका होणार आहे. सध्या हेच आंकडे अनुक्रमें एक एक कोटी असे आहेत. सध्या ध्वनिक्षेपण केंद्रांपासून ३२ लाख रुपये उत्पन्न होतें. सरकारी मालकीच्या ह्या ध्वनिक्षेपक केंद्रांवरून जाहिराती करता येणार नाहींत. त्याचप्रमाणें कोणाही खाजगी व्यक्तीला स्वतंत्र रीतीनें ध्वनिक्षेपक केंद्रें उघडू दिलीं जाणार नाहींत. इंग्लंडमधील बी. बी. सी. हें ज्याप्रमाणें सार्वजनिक सत्तेखालीं आहे त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील रेडिओ वापरला जाऊं देण्याची सरकारची मनीषा नाहीं. हिंदुस्थानाबाहेरील देशांना अनुलक्षून करण्यांत येणारें वृत्तक्षेपण अधिक वाढविण्याचाही सरकारचा विचार नाहीं. अखिल भारतीय रेडिओ इंग्लंडमधील बी. बी. सी. केंद्राचे कार्यक्रम येथील लोकांसाठीं क्षेपित करतो. त्याचप्रमाणें यापुढेंही तीच पद्धत चालू रहाणार आहे. हिंदी लोकांना बी. बी. सी. रेडिओ ऐकणें जरूर वाटतें त्यामुळें पूर्वीचीच पद्धत चालू ठेवण्यांत आली आहे.

---

## दि म्हैसूर ग्लास ॲंड एनॅमल वर्क्स लि., बंगलोर

### ( वार्षिक सभा : ६ एप्रिल, १९४७ )

वरील कंपनीनें १९४६ सालीं ३४,१२८ रु. ठोक व ४५,११६ रु. निवळ नफा मिळविला. भागीदारांना १०% डिव्हिडंड देण्याकडे ४०,००० रुपयांचा विनियोग केला जाणार आहे, आणि ५,२५५ रु. रिझर्व्ह फंडांत जातील. "कामगार व कंपनी ह्यांचेमधील संबंध सलोख्याचे आहेत." मॅनेजिंग एजन्सीचे (ओगले ग्लास वर्क्स लि.) दोन प्रतिनिधी जर्मनीस नुकतेच जाऊन आले. त्यांनीं कंपनीसाठी कांहीं यंत्रसामुग्रीच्या खरेदीची व्यवस्था केली आहे. तिच्या उभारणीसाठी कंपनी भांडवल वाढवून विक्रीस काढणार आहे. कंपनीचें आजचें वसूल भांडवल ४ लक्ष रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड १ लक्ष, ४२ हजारांचे आहेत. कंपनीनें शिलकी रकमा रोख्यांत व ठेवींत गुंतविलेल्या आहेत. ह्यावरून कंपनीची सुस्थिति लक्षांत येईल. मॅनेजिंग एजंटांचे वतीनें श्री. शंकरराव ओगले हे कंपनीची व्यवस्था पहात आहेत. म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सचे चालू वर्षाचे ते अध्यक्ष आहेत, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

---

# खाजगी मालकी, सरकारी नियंत्रण व राष्ट्रीयीकरण

लेखकः—श्री. भास्कर महादेव काळे. एम्. ए. बी. टी.

## प्रास्ताविक

हिंदुस्थानपुढें धोरण निश्चित करण्याच्या दृष्टीनें जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांपैकीं उद्योगधंदे खाजगी मालकीचे असावे, कीं सरकारनें त्यांवर नियंत्रण ठेवावें, कीं त्यांचें पूर्णत्वानं राष्ट्रीयाकरण करण्यांत यावें हा प्रश्न विशेष महत्त्वाचा आहे. सरकारचें कार्यक्षेत्र आतां पूर्वीप्रमाणें अंतर्गत शांतता व परचक्रापासून संरक्षण एवढ्यापुरतें मर्यादित न राहातां बदललेल्या परिस्थित्यनुरूप सरकारनें निरनिराळ्या क्षेत्रांत प्रवेश केला आहे. भांडवलशाही समाजरचना असलेल्या व खाजगी संपत्तीला मान्यता देणाऱ्या राष्ट्रांमध्येंहि ही दृष्टि व बदलेलें धोरण दिसून येतें. गेल्या महायुद्धामुळें हिंदुस्थान सरकारनें आपलें कार्यक्षेत्र पुढील बाबतींत विस्तृत केलें:—धान्य, कापड, रॉकेल, साखर, यांचें वांटप; अधीक धान्य पिकविण्यासाठीं तेल-बिया व कापूस यांच्या पिकांचें क्षेत्र कमी करणें; नवीन कंपन्यांच्या स्थापनेवर व भांडवलावर नियंत्रण; आयात व निर्यात याबद्दल नियंत्रण किंवा परवाने; कांहीं परवाने सरकारनें आपल्या ताब्यांत घेणें; कारखानी मालाच्या उत्पादनावर सरकारी गरजेनुसार नियंत्रण इ. युद्ध संपल्यानतर यापैकीं कांहीं नियंत्रणें ढिलीं केलीं गेलीं आहेत. ह्याशिवाय निरनिराळ्या वस्तूंचे भाव-नियंत्रण सरकारनें केलें आहे. युद्ध सुरू झाल्याबरोबर वटहुकूम काढून सरकारनें सरकारी कर्जरोख्यांचे भाव स्थिर राहातील याबद्दल तरतूद केली, व तिचे अर्थ-व्यवहारावर इष्ट परिणाम झाले. वस्तूंच्या भावनियंत्रणाच्या बाबतींत सरकारी धोरण फारसें उपयोगी नाहीं, व काळा बाजार निर्माण झाला. आजच्या परिस्थितीच्या दृष्टीनें सरकारी नियंत्रण, राष्ट्रीयकरण इ. गोष्टींचें विवेचन येथें करूं.

## थोडी तात्त्विक व ऐतिहासिक बाजू

उद्योगधंद्यांची खाजगी मालकी ही भांडवलशाही समाजाचें मुख्य लक्षण होय व १८ व्या शतकाच्या अखेरीस त्याची तरफदारी अॅडम स्मिथ व रिकार्डो ह्यासारख्या अर्थशास्त्रज्ञांनीं केली. १९ व्या शतकांतील लोकशाहीच्या कल्पनांमुळें पूर्वपरंपरागत सरकारच्या कार्यक्षेत्रांत बहुजनसमाजाचें हित साधण्याच्या दृष्टीनें फरक पडत चालला, व सुरवातीला फॅक्टरी अॅक्टसच्या रूपानें खाजगी धंद्यांवर अल्प प्रमाणांत नियंत्रण येऊं लागलें. मजूर संघटनेला मान्यता मिळाल्यामुळें उद्योगधंद्यांवर नियंत्रण येऊं लागलें. नवीन पद्धतीच्या कर-आकारणीमुळेंहि उद्योगधंद्यांवर बंधनें आलीं व भांडवलशाहीचे दुष्परिणाम टाळण्यासाठीं समाजसत्तावादाचीं तत्त्वें उदयास आलीं. त्या तत्त्वांचा निश्चित परिणाम निरनिराळ्या सुधारलेल्या सरकारांच्या राज्यकारभारावर दिसून आला; व एखाद्या महत्त्वाच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण केलें जावूं लागलें. विशेषतः रेल्वेजचें राष्ट्रीयकरण होऊं लागलें. पोष्ट, तार, टेलिफोन व रेडियो ह्या खात्यांचेंहि राष्ट्रीयकरण होऊं लागलें. अगदीं अलिकडच्या काळांत खनिज पदार्थांच्या खाणी, विद्युत् शक्तीचें उत्पादन व पुरवठा, देशांतील मध्यवर्ती बँक इ. चें राष्ट्रीयीकरण करण्याकडे प्रवृत्ति आहे. रशियांतील समाजसत्तावाद व इतर आंतरराष्ट्रीय कल्पना ह्यामुळेंहि १९१९ नंतरच्या काळांत अल्प प्रमाणांत राष्ट्रीयीकरणाला चालना मिळाली आहे.

## हिंदुस्थानांतील परिस्थिति

हिंदुस्थानांत १८६० नंतर अगदीं अल्पप्रमाणांत भांडवलशाहीला सुरवात झाली. प्राचीन काळापासून आजतागायत हिंदुस्थानची अर्थ-व्यवस्था 'खाजगी संपत्ति' व 'वंशपरंपरेनें चालणारे हक्क' यांच्यावर अधिष्ठित आहे. परकी ब्रिटिश सरकारनें तीच परंपरा राखली. बदलणाऱ्या कालप्रवाहामुळें सरकारचें कार्यक्षेत्र थोडें व्यापक होत गेल्यामुळें, शिक्षण, पाटबंधारे, पोष्ट व विशेष उत्तेजन देऊन रेल्वेचे रस्ते बांधणें इ. बाबतींत सरकारी व्यवस्था किंवा कांहीं वेळां सरकारी नियंत्रण हळू हळू रूढ होत गेलें. सरकारनें नमुन्याच्या स्वतःच्या शिक्षणसंस्था काढल्या, परंतु ग्रँट-इन्-एड कोडाच्या अन्वयें खाजगी शिक्षण संस्थांना योग्य तें नियंत्रण ठेऊन मदत करण्याचें धोरण जास्त प्रमाणांत रूढ केलें. शिक्षण व किरकोळ आरोग्यविषयक गोष्टी वगळल्यास १९१९ पर्यंतचा हिंदुस्थान सरकारचा कारभार अगदीं संकुचित स्वरूपाचा होता. देशी उद्योगधंद्यांना कोणत्याहि तऱ्हेनें उत्तेजन न देणें, स्वतः लोकांनीं काढलेले उद्योगधंदे ब्रिटिश व्यापारी हितसंबंधाला घातक होत नसल्यास त्याच्या आड न येणें, व परराष्ट्रीय भांडवलाच्या आयातीवर कोणत्याहि प्रकारें नियंत्रण न ठेवणें असें निष्क्रियतेचें सरकारी धोरण होतें. त्यामुळें कांहीं गुजराथी, पार्शी व मारवाडी लोकांनीं स्वतःच्या हिमतीवर कापड गिरण्या व इतर किरकोळ कारखाने सुरू केले. १९१९ च्या सुधारणा कायद्यांत, हिंदुस्थानची आर्थिक स्वायत्तता मान्य केली गेल्यानंतर, हिंदी अर्थव्यवस्थेला किंचित निराळें वळण लागलें. 'उद्योगधंदे' व 'मजूर' हीं नवीं खातीं प्रांतिक सरकारांत सुरू झालीं. १९२३ नंतर 'आर्थिक कमिशन'च्या शिफारसीप्रमाणें टॅरिफ बोर्डाकडून चौकशी करवून संरक्षणास पात्र असलेल्या धंद्यांना सरकारनें संरक्षण द्यावयास सुरवात केली. संरक्षणाचा भरपूर फायदा पोलाद, कापड, साखर, काड्यांच्या पेट्या इ. धंद्यांना मिळाला. संरक्षणाचा भार पर्यायानें जनतेवरच पडतो. खाजगी उद्योगधंद्यांच्या बाबतींत सरकारनें स्वीकारलेली भूमिका कांहींशी नियंत्रणाच्या स्वरूपाचीच आहे. सध्यांहि १९४७ एप्रिल पासून कोणत्या धंद्यांना संरक्षण चालू ठेवावें याबद्दल शिफारसी करण्यासाठीं सरकारनें टॅरिफ बोर्ड नेमलें आहे. आंतरराष्ट्रीय मजूरसंघटनेच्या नेतृत्वामुळें मजूरविषयक कांहीं कायदे हिंदी कारखानदारांना स्वीकारावे लागले, ऑगस्टपासून गिरण्यांत कामाचे तास आठ करण्यांत आले. १९४१ च्या गुमास्ता कायद्यानें नोकरवर्गाच्या बाबतींत कांहीं नियंत्रणें मुंबई प्रांतांत सुरू करण्यांत आलीं आहेत. मजुरांच्या हितासाठीं ऑफिसर्स नेमण्याची प्रथा, सरकारकडून लेबर वेलफेअर सेंटर्स सुरू केले जाणें, ट्रेड डिस्प्यूट्स कायदे, मजुरांना निरनिराळ्या कायदेमंडळांत मिळालेला प्रतिनिधी निवडण्याचा हक्क व सरकारांत मजूर मंत्र्याची स्वतंत्र जागा इ. गोष्टी कांहीं प्रकारचें सरकार नियंत्रणच सुचवितात. सारांश, आजच्या काळाचा ओघ असा आहे कीं खाजगी मालकांच्या अनिर्बंध मालकीहक्काला विविध तऱ्हेनें कात्री लागली आहे. याची पुढची पायरी म्हणजे एकाद्या धंद्याचें संपूर्ण राष्ट्रीयीकरण.

## धोरण निश्चित करण्याची आवश्यकता

अर्थशास्त्राचीं सर्व तत्त्वें सापेक्ष म्हणजे विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असणारीं असतात. आर्थिक व्यवहारांत औद्योगिक क्षेत्रांत खाजगी मालकी कोठें चालावी, सरकरी नियंत्रण कोणत्या धंद्यांत व कोणकोणत्या बाबतींत असावें व कोणत्या धंद्याचें संपूर्ण राष्ट्रीयीकरण केलें जावें या बाबतींत मध्यवर्ती सरकारनें त्वरित धोरण निश्चित केलें पाहिजे. हें ठरवितांना उपयुक्तता, बहुजन

समाजाचें हित व धंद्यांचें विशिष्ट महत्त्व इ. गोष्टी विचारांत घेतल्या जाव्या. उ. वनस्पती तूप आरोग्याला घातक आहे असें सिद्ध झाल्यास सरकारनें वनस्पती तुपाचे कारखाने कायद्यानें बंद केले पाहिजेत. कापडाचें उत्पादन हा अन्नाचे खालोखाल आवश्यक धंदा असल्यामुळें त्यावर परिणामकारक सरकारी नियंत्रण लादावें किंवा जरूर तेथें ह्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें. खनिज द्रव्यांच्या खाणी व वीजनिर्मिती व पुरवठा ह्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण झालेंच पाहिजे. रेशमी कापड किंवा उच्च तऱ्हेची कलाकौशल्याचीं कामें हे धंदे खाजगी मालकीचेच राहाणें बरें. सर्व शेत जमिनीचें राष्ट्रीयीकरण केल्यास, शेतीचा प्रश्न व शेतकऱ्याचा प्रश्न सहज सुटेल. जुनें युद्धोत्तर पुनर्घटना खातें नष्ट झालें आहे. मध्यवर्ती सरकारनें पुनर्घटना खातें सुरू करून, औद्योगिक नियंत्रणाचा प्रश्न त्वरित हातीं घ्यावा व सर्व हिंदुस्थानांत धोरणाचा एकसूत्रीपणा निश्चित करावा.

### "ए. बी. सी." बंद पडली

असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., मुंबई, ह्या बँकेनें बुधवार ता. १९ रोजीं आपले दरवाजे बंद केले ! ही बँक १९४२ सालीं स्थापन होऊन तिच्या १२ शाखा होत्या. तिचेकडील ठेवींची रक्कम ३½ कोटि रुपये होती. त्रावणकोर नॅशनल अँड क्विलॉन बँक १० वर्षांपूर्वी ज्या इमारतींत बंद पडली, तीच इमारत 'ए. बी. सी.' नें व्यापली होती. गेला सबंद महिना बँकेकडे ठेवीदारांच्या मागण्या येत होत्या, त्या बँक पुऱ्या पाडीत आली होती. बँकेतर्फे सर जमशेटजी कांगा ह्यांनीं मुंबई हायकोर्टीत कंपनी कायद्याच्या २७७ एन कलमाप्रमाणें अर्ज करून, दोन महिनेपर्यंत बँकेविरुद्ध कोणतेंहि काम चालू नये, असा हुकूम मागितला. लिक्विडेशनमध्यें जाण्याची बँकेची इच्छा नाहीं; थोडासा अवधि मिळाला, तर बँक आपलें सर्व देणें देऊं शकेल, असें बँकेतर्फे सांगण्यांत आलें. १४ मार्च १९४७ रोजीं बँकेच्या देण्यापेक्षा जिंदगी २९ लक्ष, २३ हजार रुपयांनीं ज्यास्त होती. सुमारें तीन आठवडे बँकेकडील ठेवी परत जात राहिल्या आणि १८ मार्चपर्यंत तिनें १ कोटि, १७ लक्ष रुपयांच्या ठेवी परत केल्या. रोख रक्कम संपल्यामुळें तिला १९ मार्च रोजीं पैसे देणें बंद ठेवावें लागलें. हायकोर्टाचे न्यायाधीश न्या. तेंडोलकर ह्यांनीं हिशेब दाखल करण्यास बँकेस सांगितलें आहे.

### हिंदी औद्योगिक कच्चा मालाच्या किंमती : तुलना
( ऑगष्ट १९३९ अखेरचें वर्ष=१०० )

| | |
|---|---|
| नोव्हेंबर १९४६ | ३५४.० |
| डिसेंबर १९४६ | ३४८.५ |
| जानेवारी १९४७ | ३५०.९ |
| फेब्रुवारी १९४७ | ३५२.१ |

### हिंदी अन्नाच्या किंमती : तुलना
( २६ ऑगस्ट १९३९ अखेरचा आठवडा : १०० )

| | |
|---|---|
| डिसेंबर १९४६ | २६२.५ |
| जानेवारी १९४७ | २७६.८ |
| फेब्रुवारी १९४७ | २७३.४ |

**बंगालमधील बँका**—बंगालमधील कांहीं बँका आपलीं देणीं देऊं शकल्या नाहींत, हें वृत्त पूर्वींच प्रसिद्ध झालें आहे. तेथील पांच बँकांनीं कंपनी कायद्याच्या २७७ व्या कलमास अनुसरून मुदत मागितली आहे, दोन लिक्विडेशनमध्यें गेल्या आहेत, तिघांनीं लिक्विडेशनसाठीं अर्ज केला आहे, दोघांनीं घेणेकऱ्यांशीं वाटाघाटी करण्याचा प्रयत्न चालविला आहे आणि एक बँक दुसऱ्या एका बँकेशीं एकत्रीकरण करूं पहात आहे.


# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

फोन नं. ४८२ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ११

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

# बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११

—मुख्य कचेरी—
सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५०

खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर

# दी बँक ऑफ् औंध लिमिटेड.

## तुलनात्मक प्रगतीचा तक्ता.

| साल | जमा, शेअर भांडवल. | रिझर्व्ह फंड | इतर रिझर्व्हज् | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण नफा | निव्वळ नफा | डिव्हिडंड रकम | डिव्हिडंड दर (टक्का) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९३३ | १,०५,१७० | ० | ० | ६,९७,००० | ८,५३,००० | १०,४६६ | ५३८९ | २७३८ | ५% | |
| १९३४ | १०७,३०० | १३५० | ३१०६ | ७,६०,००० | ८,१६,००० | १८,९५९ | १०,४७२ | ६३५९ | ६ | |
| १९३५ | १०९,७४० | ४०२० | ६००० | ७,२७,००० | ८,८१,००० | २८,७०६ | १०,८५८ | ६४९९ | ६ | |
| १९३६ | १,११,२५० | ६७५० | ८६६१ | ८,३३,००० | १०,१९,००० | २५,६३५ | १४,३६९ | ६६१५ | ६ | |
| १९३७ | १,१३,७४० | १०,३५० | १४,४०० | ८,३१,००० | १०,०६,००० | २८,५९० | १५,६२७ | ६७४८ | ६ | |
| १९३८ | १,१८,६४० | १४,५०० | २०,८०० | ५,६२,००० | ८,०५,००० | ४०,५६२ | १५,९३७ | १०,५३४ | ६ | |
| १९३९ | १,२८,०५० | १७,७०० | २२,५०० | ६,७५,००० | ९,००,००० | २२,९३९ | ६,४४५ | ४,९३५ | ४ | |
| १९४० | १,३१,४६० | १९,०८५ | २२,६०० | ७,५२,००० | ९,५५,००० | १९,३८४ | ३,२३४ | ३,८६५ | ३ | |
| १९४१ | १,३१,७५० | १९,७३४ | २१,४०० | ७,५०,००० | ९,४६,००० | १९,०६७ | १९७ | ० | ० | |
| १९४२ | १,३३,७७० | १९,७३४ | १७,८०० | ९,५७,००० | ११,५६,००० | २१,७८७ | २,८५७ | ० | ० | |
| १९४३ | १,३६,२०० | १९,७३४ | १२,७२० | ११,५१,००० | १३,५६,००० | ३३,८८६ | ६,१५७ | ५,३९५ | ४ | |
| १९४४ | १,३८,०२० | २१,६०० | १३,४०० | ८,५६,००० | १०,७६,००० | ४४,३८९ | १५,८६० | ८,२२७ | ४+२ | |
| १९४५ | १,४२,००० | २७,६०० | ११,६०० | १३,५२,००० | १५,६८,००० | ३९,९२८ | ९,४३५ | ५,५८७ | ४ | |
| १९४६ | १,५४,२१० | २९,६६० | २९,०१० | १७,४१,००० | १९९४,००० | ६९,५४० | २५,११२ | ६,४०६ | ४½ | |

## दि बँक ऑफ औंध लिमिटेड

(औंध संस्थानांत स्थापन झालेली. सभासदांची जबाबदारी नियमीत.)

सन १९३२:–ता. ८-१०-३२ रोजीं औंध स्टेट बँकेचें लिमिटेड बँकेंत रूपांतर करणेंत आलें. औंध स्टेट सेंट्रल बँकेची स्थापना होऊन तिनें स्टेट बँकेचा सर्व व्यवहार होता तसा आपले ताब्यांत घेतला. सदर बँकेचे मॅनेजर म्हणून श्री. बी. आर. वर्तक यांना मुं. प्रां. को. बँकडून, लेंड सर्व्हिसनें घेऊन नेमणेंत आलें.

सन १९३५:–स्टेट बँकेच्या वेळची क्रिन्हई येथील शाखा बरोबर चालत नसलेनें ती बंद केली.

सन १९३६:–सदर सालचे सुरवातीपासुन संस्थानच्या ट्रेझरीचें काम बँकेकडे सोपविणेंत आलें. बँकेची बिचूद रेल्वे स्टेशनजवळील वसाहतींत शाखा उघडणेंत आली.

सन १९३७:–दिघंची ता. आटपाडी येथें बँकेची नवीन शाखा उघडणेंत आली.

सन १९३८:–ता. २६–८–१९३८ रोजीं औंध स्टेट सेंट्रल बँकेचें रूपांतर औंध स्टेट बँकिंग व इन्शुरन्स कंपनींत करण्यांत आलें. आयुष्याचा विमा उतरणेचे कामाकरतीं वेगळें विमा खातें सुरू करणेंत आलें. कामाचें वर्ष जूनचें डिसेंबर असेर बदललें. १९३८ साल असेरचा नफा अठरा महिन्यांचा असून डिव्हिडंड दीड वर्षाचें देणेंत आलें. या सालीं ओगलेवाडी येथें शाखा उघडणेंत आली.

सन १९३९:–या सालीं विमा खात्याचे प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. विमा खात्याकडे रु. ५०,०००/–गव्हर्मेंट सिक्युरिटी घेणेसाठी बिन व्याजी गुंतलेमुळें व त्याकरतां ठेवी घेतल्यामुळें ठेवींच्या व्याजाचा बोजा बँकेवर पडला. यामुळें बँकेचे नफ्यावर व व्यवहारावर अनिष्ट परिणाम झाला. या सालीं बिचूद येथें बँकेनें कोठार व बँकेची इमारत रु. ६,०००/– खर्चून बांधिली.

सन १९४०:–औंध येथील हेड ऑफीसचे इमारतीचें काम पुरें झालें व त्याचें उद्घाटन श्रीमंत राजेसाहेब संस्थान औंध यांचे हस्तें झालें. इमारतीस एकूण खर्च रु. २५,०००/– आला.

सन १९४१:–विमा खातें बंद करून बँकेचे मदतीनें औंध म्युच्युअल लाइफ अॅशुअरन्स सोसायटी लि. ची स्थापना करण्यांत आली व तिचेकडे विम्याचा व्यवहार वर्ग करणेंत आला. जुन्या स्टेट बँकेचीं सर्व कर्जें त्या कर्जांत येणारा निम्मा तोटा बँकेनें सोसणेचें कबूल करून, संस्थानकडे वर्ग करणेंत आलीं.

सन १९४२:–औंध स्टेट बँकेच्या कर्जांतील बँकेनें सोसणेची तोटा भरपाई रु. ४,२१४ ची करणेंत आली. बँकेची गुगदाळ शाखा फायद्यांत चालत नसलेमुळें ती बंद केली.

सन १९४३:–औंध स्टेट बँकेच्या कर्जापैकी बँकेनें सोसणेची तोटा भरपाई रु. ४५२३/–करणेंत आली. या सालीं दिघंची शाखा नफ्यांत चालत नसलेमुळें बंद करणेंत आली.

सन १९४४:–या सालीं कंपनीचें नांव बदलून ते दी बँक ऑफ औंध लिमिटेड असें करणेंत आलें. या सालीं औंध स्टेट बँकेच्या कर्जापैकी बँकेनें सोसणेचा तोटा रु. ३३९९।– संस्थानास देणेंत आला.

सन १९४५:–जुन्या स्टेट बँकेच्या कर्जापैकी बँकेनें सोसणेची तोट्याची रक्कम रु. ५४३५ संस्थानास देऊन जुन्या स्टेट बँकेच्या कर्जाच्या तोट्यांतून बँक मुक्त झाली. या सालीं बँकेची कुंडल शाखा बंद करणेंत आली.

सन १९४६:–डिसेंबर महिन्यांत बिचूद शाखेवर डाका पडून सुमारें रु.३०,०००/–चें बँकेस नुकसान पोचलें. ता. १८–११–४६ रोजीं बँकेचें सातारा येथें ऑफीस उघडणेंत आलें. जनरल सभेनंतर रिझर्व्ह फंडांत आणखी रु. १४,३४० ची वाढ होऊन तो रु. ४४,००० झाला व एकूण रिझर्व्हज रु. ७३,१०० चे झाले.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि., पुणें

## तुलनात्मक प्रगतीचा तक्ता

| ताळेबंदाचें वर्ष | जमा शेअर भांडवल | रिझर्व फंड | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण नफा | निवळ नफा | एकूण डिव्हि-डंडची रक्कम | डिव्हिडंडचा दर (% करमाफ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९३७ | २७,९०० | — | १,१३,६०० | १,४३,९०० | २,३०० | तोटा रु. १५० | — | — |
| १९३८ | ३८,३८० | ६० | २,५८,७०० | ३,०३,१०० | १३,५७२ | ३,१०० | ७०० | २½ |
| १९३९ | ४८,९१५ | ६७० | ३,३७,८०० | ३,९७,९०० | २२,२०० | ४,८०० | ९०० | २½ |
| १९४० | ५८,००० | २,९०० | ३,६१,००० | ४,३७,५०० | २६,००० | ५,७०० | १२,०० | २½ |
| १९४१ | ६८,४०० | ५,१०० | ५,१८,८०० | ६,०९,००० | २८,८०० | ४,३०० | १४०० | २½ |
| १९४२ | ७३,६०० | ६,००० | ९,९७,२०० | ११,०४,९०० | ३७,८०० | ६,००० | १९०० | ३ |
| १९४३ | १,०६६०० | ७,३०० | १८,३५,९०० | १९,९१,७०० | ८१,७०० | १८,१०० | ३५०० | ४ |
| १९४४ | ३,५६,३०० | १७,००० | २८,२१,६०० | ३३,७१,४०० | १,६०,४०० | ४७,८०० | ६,८०० | ४ |
| १९४५ | ४,६१,००० | ३७,६०० | ४२,३३,८०० | ४८,२५,८०० | २,१३,६०० | ६४,४०० | १७,१०० | ४ |
| १९४६ | ७,०१,४९० | ५२,००० | ४९,८०,००० | ६०,५०,००० | २,८२,१०० | ६९,९९६ | २२,९४५ | ४ |

सन १९४४ सालीं बँकेनें आपली मुंबई येथें शाखा उघडली.

**"ग्रेट ब्रिटनमध्यें या"**—ग्रेटब्रिटनमध्यें प्रवासी आकर्षण्या-साठीं ब्रिटिश ट्रॅव्हल असोसिएशननें जगभर प्रचार चालविला आहे. सुमारें ५ लक्ष मोठीं चित्रें सगळीकडे वाटण्यांत आलीं आहेत. इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश व पोर्तुगीज भाषांत छापलेल्या ५० पानी सचित्र परिचय पुस्तकांच्या ३ लक्ष प्रती प्रसृत करण्यांत आल्या आहेत. ब्रिटिश हॉटेलांचीं पन्नास हजार माहितीपत्रकेंहि वाटण्यांत आलीं आहेत. ग्रेट ब्रिटन विषयक चित्रपटहि जगभर दाखविण्यांत येणार आहेत.

**शेतमजुरांच्या परिस्थितीची चाकशी**—शेतांत काम करणाऱ्या मजुरांच्या परिस्थितीविषयीं हिंदुस्थान सरकार तपशीलवार चौकशी करीत आहे. त्यासाठी एक प्रश्नपत्रिका तयार करण्यांत आली आहे, तिचेमध्यें एकूण ३० प्रश्न आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांतील एकूण १,१३० म्हणजे प्रत्येक ४०० खेडेगांवांपैकीं एका खेडेगांवाची पहाणी केली जाईल.

**खंडसारी साखर**—खंडसारी साखरेच्या उत्पादनास मुंबई सरकारनें बंदी केली आहे.

**चात्यांचा कारखाना**—दरमहा ४०,००० चात्यांचें उत्पादन करणारी एक कंपनी हिंदुस्थानांत लवकरच स्थापन होत आहे. कंपनीच्या भांडवलांतील ७४% भाग हिंदी लोकांच्या हातीं रहातील आणि २६% भाग टेक्स्टाइल मशिनरी मेकर्स लि. ह्या ब्रिटिश कंपनीकडे रहातील. ह्या ब्रिटिश कंपनीच्या वाट्याच्या ३९ लक्ष रुपयांच्या शेअर्सपैकीं १३ लक्ष रुपयांचा रोख भरणा ती करील आणि २६ लाखांचे शेअर्स तिला गुड वुईल, पेटंट, तांत्रिक सहाय, संशोधनाचा फायदा इत्यादींसाठी बहाल केले जातील.

**तबकड्यांचें उत्पादन**—अमेरिकेंत १९४६सालीं ग्रामोफोनच्या २७½ कोटि तबकड्यांचें उत्पादन झालें. १९४७ सालीं तें ३० कोटींवर नेलें जाईल.

**प्रेसिडेन्सी इं. बँक, लि. चे नवे डायरेक्टर**—प्रे.इं. बँकेच्या मुंबई लोकल अडव्हायसरी कमिटीचे चेअरमन श्री. एल्. एस्. जोशी, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी., ह्यांची बँकेच्या डायरेक्टरचे जागीं निवड झाली आहे.

**साहित्यिक लॉर्ड वेव्हेल**—हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय, व्हायकाउंट् वेव्हेल ऑफ विंचेस्टर अँड सिरेनिका, हे सैनिक म्हणून प्रसिद्ध आहेतच. परंतु, त्यांनीं अनेक ग्रंथहि लिहिलेले आहेत. लॉर्ड ॲलनबीचें चारित्र ( २ खंड ) हा त्यांचा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. १९४४ सालीं त्यांनीं एक कविता-संग्रहहि प्रसिद्ध केला होता.

**पानसुपारीः**—पुणें मर्चेट्स को. बँकेनें प्रतिवर्षाप्रमाणें यंदाहि रविवार ता. २३ रोजीं गुढीपाडव्यानिमित्त सरस्वती व लक्ष्मी पूजन करून पानसुपारी समारंभ केला.

**दि कर्नाटक ग्लास इंडस्ट्रीज लि., हुकेरीरोड**—वरील कंपनी खाजगी कंपनी म्हणून २२ मार्च १९४५ रोजीं स्थापन झाली, तिचें एप्रिल १९४६ मध्यें पब्लिक लिमिटेडमध्यें रूपांतर करण्यांत आलें. मि. फ्रामरोज कत्रक ह्या सुप्रसिद्ध काच तज्ञांचे देखरेखीखालीं कारखाना चालणार आहे, ही नमूद करण्याजोगी गोष्ट आहे. हुकेरी रोड ही जागा काचेच्या धंद्यास सर्व दृष्टींनीं सोईची आहे. कारखान्याच्या इमारतींचें काम पुरें होत आलें असून काचेच्या उत्पादनास लवकरच प्रारंभ होईल. मेसर्स एच्. ए. शहा आणि कं. ह्यांकडे मॅनेजिंग एजन्सी आहे. त्यांनीं व डायरेक्टरांनीं मिळून २ लक्ष रुपयांचे भाग घेण्याचें ठरविलें असून एकूण विक्रीस काढलेलें भांडवल ५ लक्ष रु. आहे. श्री. अण्णासाहेब दट्टे हे कंपनीस चेअरमन लाभले आहेत.

**मुंबईतील कामगारांना बोनस**—मुंबईतील गिरण्यांतून काम करणाऱ्या कायम अगर हंगामी कामगारांना १९४६ च्या त्यांच्या मिळकतीच्या एक पंचमांश इतका बोनस मिळणार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

पुणें-प्रदर्शनांतील स्टॉल नं. १४० पहाण्यास विसरूं नका.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

साप्ताहिक बंद भाव

व्याज-वजा
कोहिनूर रु. १३ दि. २५-३-४७
गोकाक रु. १२ दि. ७-४-४७

व्याज-वजा
अपोलो रु. ०-४-० दि. ३१-३-४७
बॉम्बे डाइंग-बोनस शेअर रु. ४० दि. ७।४।४७
फिनले रु. १५ दि. २५।४।४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १८।३।४७ | बुधवार १९।३।४७ | गुरुवार २०।३।४७ | शुक्रवार २१।३।४७ | सोमवार २४।३।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३११७-८; २५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २३०५ | २२८७-८ | २३६० | | २३३७-८ |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४२७ | ४२८ | ४३४ | | ४२९ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २८-१२ | २९ | ३०-४ | | २९-६ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३८-१२ | ३८-८ | ३९-८ | | ३८-८ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३१७०-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | २२८० | २३०० | २३२० | सार्वजनिक सुट्टी | २३०५ |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ७४५ | ७३२ | ७५० | | ७५२ |
| ९९९; ६६० | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६४२ | ६२२ | ६४८ | | ६३८ |
| ५६७; ३९८ | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३२७ | ३१३ | ३२५ | | ३१८ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३१८ | ३१२ | ३२५ | | ३२२ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३२५ | ३१४ | ३२५ | | ३२१ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३२५ | ३२५ | ३३२ | | ३२३ |
| ७४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-६ | ४-६ | ४-१० | | ४-१० |
| २९-१; १६-१२ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६-४ | १६-८ | १७-० | | १६-८ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड | १ | ३-८ | ३-८ | ३-११ | | ३-१० |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६३५ | ६३२-८ | ६४० | | ६३० |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १८७ | १८५ | १८९-८ | | १८५-८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४५ | २४१ | २५९ | | २५६-० |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५०२-८ | ४७२-८ | ४९५ | | ४८५-० |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३३-२ | ३३-४ | ३४-१४ | | ३३-२ |

सोमवार दि. २४-३-४७ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १७४ | आंध्र व्हॅली | १५८५ | अलकॉक | ५६० |
| सेंट्रल | १३०-८ | बॉम्बे ट्रॅम | ११२-१ | न्यू इंडिया | ६३ |
| इंडिया | २४२ | टाटा हायड्रो | १८७ | शिवराजपूर | ४१ |
| इंपी० | २४०० | टाटा पॉवर | १६८५ | टाटा केमिकल | १७-८ |
| | ५९० | | | टाटा ऑइल | ८६-८ |
| रिझर्व्ह | १२२ | | | विमको | २६५ |

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. )


अंदाजपत्रकांतील धंद्यांवरील २५ टक्के नफ्यांचें कलम सिलेक्ट कमिटींतून बाहेर पडलें आहे. २५ टक्के कराची मर्यादा कमी करण्याचे बहुमतवाल्यांनी आणि अर्थमंत्री मि. लियाकत अल्ली-खाननीं अमान्य केल्यामुळें कमिटीच्या अल्पमतवाल्या नऊ सभासदांनीं एक जोरदार भिन्न मतपत्रिका अहवालास जोडली आहे. सिलेक्ट कमिटीनें कंपन्यांच्या भांडवलावरील पांच टक्के व खाजगी कंपन्यांना सहा टक्के अशा नफ्यास गणतीकरितां माफी दिली आहे. गेल्या बुधवारीं भाव प्रथम २५ टक्के कायम राहिले या निराशेनें एकदम खालीं गेले पण दुःखांतें सुख ५ टक्के माफी मिळाली आहे म्हणून पुन्हा वर आले. डिफर्ड २२९० वरून २२३० व नंतर २२९० असे बुधवारीं फेरफार झाले. गुरुवारीं पंडित जवाहरलाल प्रभृति अंदाजपत्रकाबाबत, अर्थमंत्र्यांस भेटण्यास गेल्याच्या बातमीनें बाजार एकदम वरील कलमास खाणखी मुरड पडले या आशेनें बराच सुधारून डिफर्ड २३६० पर्यंत बंद झाला. त्यानंतर शनिवारीं मंत्रिमंडळांत या बाबत पुन्हा मतभेद वाढल्याची बातमी आलेली आहे आणि हा अंक बाहेर पडेतोंवर काय निकाल होतो हें सांगतां येत नाहीं. पण एवढें दिसत आहे कीं कॉंग्रेस पक्षाचे लोक कायदेमंडळाच्या खुल्या बैठकींत अंदाजपत्रकास निश्चित विरोध करतील आणि अंदाजपत्रकांतील हें कलम फेंटाळून लावतील. याच संधीस व्हॉइसरायची अदलाबदल होत आहे आणि मध्यवर्ती सरकारच्या अधिकार क्षेत्रांत मोठाले फेरफार होण्याचा प्रसंग येणार आहे. आलेल्या बातम्यांवरून असें वाटतें कीं या कलमामुळें एक नवा राजकीय पेचप्रसंग मध्यवर्ती सरकारपुढें येऊं पहात आहे आणि त्यांतून नव्या व्हॉइसरायच्या कर्णधारित्वानें अंदाजपत्रक कशा स्वरूपांत बाहेर पडेल हें सांगतां येणें कठीण आहे. एकंदरीनें अस्थिरतेचें वातावरणच कायम राहणार असें दिसतें.

---

**आशिया स्नेहसंबंध परिषद—** आशिया खंडांतील राष्ट्रांचें स्नेहवर्धन होऊन त्यांच्यामधील दळणवळण वाढवावें व आशिया खंडांतील राष्ट्रांस जागतिक घडामोडींत निर्णायक स्थान प्राप्त व्हावें, ह्या दृष्टीनें वरील परिषद दिल्ली येथें भरविण्यांत आली आहे. ३० देशांचे २५० प्रतिनिधी परिषदेंत भाग घेत आहेत.


**लग्नसमारंभास व मेजवानीसाठी**
—रुमॉक्सचा—
शुद्ध साखरेचा केशरयुक्त
**:: सुधारस ::**
**वापरा**
बाटली किंमत २-८-०
घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.
मागविण्याचा पत्ताः—एम्पायर एजन्सीज,
६५२, सदाशिव, लक्ष्मी रोड, पुणें २.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८





**साठे बिस्किटें**
युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा यावाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.
**व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी**



पुणें चीफ एजंट:—
न्यू वृत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

**डोंगरे** यांच्या **बालामृतानें** अशक्त मुलें सशक्त होतात.



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि वर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.